सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

माझे नाव : भागवत भाउसाहेब लांबे
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : सेवा निवृत्त,
राहणार : जि.नाशिक.

शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही.बाबर

१. मी रामदास कुलट, राजेंद्र होले व महेश राजुरकर यांना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

२. सन २०१७ साली मी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, विभागीय कार्यालय, नाशिक येथे प्रभारी विभागीय व्यवस्थापक म्हणुन कार्यरत होतो. सदरची संस्था ही महाराष्ट्र शासनाची नोडल ऐजन्सी असून ती शासनाने वेळोवेळी राबविलेल्या योजनेअंतर्गत कृषी अवजारे, खते, पशुखाद्य, जंतुनाशके व नोगा उत्पादने इत्यादी कृषी साहित्य वाटप करण्याचे काम करतात. अहमदनगर व नाशिक हे दोन्ही विभाग आमच्या नाशिक विभागीय कार्यालयाअंतर्गत कृषी साहित्य वाटपासाठी येतात. अहमदनगर करिता वाटप कार्यालय म्हणुन मार्केट यार्डमध्ये आमचा उपविभाग आहे. आरोपी हे आमच्या अहमदनगर येथील उपविभागामध्ये कार्यरत होते. कुलट हे लिपीक म्हणुन, राजेंद्र होले हे सहायक व्यवस्थापक व राजुरकर हे देखील सहायक व्यवस्थापक म्हणुन कार्यरत होते. लिपीक पदाकरिता बॅकेचे सर्व व्यवहार पाहणे, आलेल्या पैशांचे नोंदी घेणे, आलेले पैशांच्या पावत्या देणे, टपालाची आवक जावक पाहणे इत्यादी काम करावे लागते. होले हे अहमदनगर उपविभागातील शाखेचे प्रमुख होते. राजुरकर हे पशुखाद्य विभागासंबंधी सर्व कामकाज पाहण्याचे काम करत होते. वर नमूद कृषी साहित्य हे उत्पादकाकडुन पुरवठा झाल्यानंतर त्याचे पेमेंट अदा करण्यासाठी आमच्या विभागीय कार्यालयाकडुन त्या पुरवठयाची पावती आल्याशिवाय रक्कम मिळत नव्हती व ती घेण्याकरिता विभागीय कार्यालयातून आमच्या प्रमुख कार्यालयाच्या नावे तशी रक्कम अदा करण्याबाबतची पावती बनवुन

पाठविणे गरजेचे होते.

३. आम्ही लक्ष्मी ड्रकेन्स सोलापूर यांच्याकडुन कृषी साहित्य पुरवठा अहमदनगर येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत येथे घेतला होता. त्यांनी संबंधित कार्यालय तसेच आमच्या विभागीय कार्यालयापर्यंत त्यांना रक्कम अदा झालेली नाही असे वेळोवेळी कळविले तेव्हा आमच्या कार्यालयामार्फत त्याची चौकशी केली तेव्हा लक्ष्मी ड्रकेन्स यांच्याकडुन कृषी साहित्य पुरवठा झाल्याचे दिसून आले पण त्यांना त्या पुरवठयाच्या रकमेबाबात कोणतीही पावती दिली गेलेली नाही असे कळाले व त्यांनी पुरवठा केलेल्या कृषी साहित्याकरिता उन्मेश फर्टीलायझररर्स, चांदा, ता. नेवासा या खत विक्रेत्याच्या नावे दिली गेली असल्याचे आढळले. आम्ही याबाबत नगर येथील आमच्या कार्यलयात विचारणा केली तेव्हा अनावधानाने अशी चूक झाल्याचे त्यांनी सांगितले. आम्हाला कार्यालयाकडुन मिळालेले उत्तर समाधानकारक वाटले नाही म्हणुन आम्ही त्या प्रकरणाव्दारे इतर खात्यांचीही सखोल चौकशी केली. तेव्हा आमच्या निदर्शनास आले की, ब—याच रकमा अथवा धनादेश, डी.डी. हे त्यांच्या नावावर जमा न होता इतर खत पुरवठाधारक किंवा बचतगट यांच्या नावावर जमा झालेले आहेत. म्हणुन आम्ही सदरची बाब आमच्या मुख्य कार्यालयाला कळविली. मुख्य कार्यालयामार्फत नगर उपविभागाचे ऑडीट करण्यात आले. ते ऑडीट वासुदेव महाले, सहायक व्यवस्थापक यांच्या मार्फत करविण्यात आले. त्या ऑडीटमध्ये आम्हाला अहमदनगर उपविभागामध्ये आर्थीक गैरव्यवहार झाल्याचे कळविण्यात आले. ऑडीटमध्ये प्रथमदर्शनी रू.६६,०३,५९८/— इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले. नगर येथील चौदा तालुक्यांमध्ये हा आर्थीक गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले होते. सदरची रक्कम ही आठ खतविक्रेते व काही बचत गट यांच्या नावे जमा झाले असल्याचे दिसून आले होते. त्या खतविक्रत्यांमध्ये उन्मेश फर्टीलायझर्स चांदा, के. प्रकाश, अहमदनगर, अभिशेख फर्टीलायझर्स, साकुद, पचोरिया वांबोरी, अक्षय फर्टीलायझर्स, संदीप फर्टीलायझर्स, बारागांव नांदूर, संत सावता कृषी सेवा केंद्र व माउली कृषी

सेवा केंद्र इत्यादी नावे आहेत.

४. त्यानंतर आमच्या मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या सुचनेनुसार मी सदर आर्थीक गैरव्यवहाराची कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे तक्रार दाखल केली. मला आता तक्रार अर्ज दाखविला. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५६** देण्यात येते.

५. फिर्याद दाखल केल्यानंतर पोलीसांनी पुन्हा माझेकडे चौकशी करून माझा पुरवणी जबाब नोंदविला होता.

बरेच कागदपत्र मुद्देमालाअंतर्गत आज दाखल झाल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(माया अ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

दि.२२/१२/२०२२

शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही.बाबर :

६. सन २०१२ ते सन २०१७ पर्यंत आर्थिक गैरव्यवहार उपविभागीय कार्यालय, अहमदनगर येथे झाल्याचे आम्हाला दिसून आले होते. आमचे मुख्य कार्यालय, मुंबई यांनी श्री.महाले यांना ऑडीट कामी नियुक्त केले होते व महाले यांनी आमच्या उपविभागीय कार्यालयातून सर्व दस्तऐवजांचे ऑडीट केले तेव्हा त्यांना एक कोटी वीस लाख अठयान्नव हजार इतका आर्थीक गैरव्यवहार अहमदनगर उपविभागीय कार्यालय येथे झाल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या अहवालानूसार आर्थीक गैरव्यवहार हा श्री.रामदास कुलट, श्री.राजेंद्र होले व महेश राजूरकर यांनी केल्याचे नमूद केलेले आहे व त्यांनी सदर

लोकांविरूध्द चौकशी करावी असाही अहवाल दिला होता. मला आता दाखल मुद्देमालापैकी पहिला व दुसरा ऑडीट रिपोर्ट दाखविला. त्यावर ऑडीट करणार म्हणुन महाले यांची सही आहे. मी महाले यांच्यासोबत काम केलेले आहे व त्यांनी आमच्या संस्थेकरिता बरेच ऑडीट रिपोर्ट तयार केलेले आहेत म्हणुन मला त्यांची सही माहिती आहे. मला महालेंनी ऑडीट रिपोर्ट दिल्यानंतर त्या ऑडीट रिपोर्टमध्ये सुचविलेल्या मुद्याप्रमाणे मी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधुन चौकशी केली होती व त्या चौकशीदरम्यान तो अहवाल मला खरा असल्याचे दस्तऐवजांच्या आधारे दिसून आले. मला महाले यांचेशी सदर अहवालाबाबत जेव्हा बोलणे झाले तेव्हा त्यांनीही त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितलेले आहे. महाले हे सध्या हयात नाही त्यांचा मृत्यु झालेला आहे. सदर अहवालास आरोपीच्या वकीलांनी निशाणी देण्यासाठी हरकत घेतली व युक्तीवाद केला की, सदर दस्त हे प्रस्तुत साक्षीदाराच्या नावे नाहीत अगर त्यावर प्रस्तुत साक्षीदाराची मिळाले म्हणुन सही नाही. साक्षीदाराने सांगितले की, अहवालामध्ये पत्र क्र.७१७१, दि.०५/१०/२०१७ चा नियुक्तीबाबतचा जो उल्लेख आहे तो आमच्या मुख्य कार्यालयामार्फत झालेला आहे तसेच दुसरा अहवाल मिळाल्याबाबत आमच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक यांच्या सहया आहेत. अहवालामध्ये महालेंना कोणी नियुक्त केले याबाबत पत्राचा उल्लेख आहे व साक्षीदाराने त्याचे सरतपासात त्या व्यक्तीची नियुक्ती कशाच्या आधारे झाली याचा खुलासा केलेला असल्याने व दुस—या अहवालावर प्राप्त म्हणुन जी सही आहे ती साक्षीदाराने ओळखुन सदर अहवाल हा चौकशी दरम्यान पोलीसांना फिर्यादी संस्थेमार्फत दिला गेला असल्याचे दिसते. सबब, सद्य स्थितीत त्यास आरोपीची हरकत बाजुला सारून **नि.क्र.५७** व **नि.क्र.५८** देण्यात येते.

७. मी जेव्हा प्राथमिक चौकशी केली होती तेव्हा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत यांनी जो डीमांड ड्राफ्ट पंपसेट पुरवठयापोटी एम.ए.आय.डी.सी.च्या नावे दिला होता तो डी.डी. उन्मेश फर्टीलायजर्स यांचे

नावे जमा झाला होता. मला आता जप्त मुद्येमाल तीन पैकी पान क्र.२२ वर दाखल पावती क्र.१४५६२ दाखविली. हीच ती पावती आहे ज्याव्दारे उन्मेश फर्टीलायझर्सच्या नावे पैसे जमा केले गेलेले आहेत. ती कृषी अभियांत्रिकी विभागाची असताना खतविभागात जमा झाल्याचे त्या पावतीवरून दिसते. सदर पावती ही साक्षीदाराने बनविलेली नाही परंतु ती पावती प्राथमिक चौकशी दरम्यान साक्षीदाराने पाहणी केली होती व प्रस्तुत प्रकरणामध्येही ती वादग्रस्त असल्याने त्यास ओळख म्हणुन **नि.क्र.५९** देण्यात येते.

न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(माया अ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

दि.०६/०१/२०२३

शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.ए.व्ही.बाबर :

८. सदरची पावती ही आमच्या नियमावलीनुसार तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांचे नावे होणे गरजेची होती. परंतु, संबंधितांनी ती पावती तालुका कृषी अधिकारी, कर्जत यांच्या नावे न बनविता ती उन्मेश फर्टीलायझर्स यांचे नावे बेकादेशीरपणे बनविली. तसेच ती पावती ही कृषी अभियांत्रिकी विभागाची असताना त्या पावतीमध्ये खत विभागाची नोंद घेतली जी चुकीची होती. सदर पावतीमध्ये पार्टी कोड व विभाग कोड दोन्ही बदललेले असल्याचेही निदर्शनास आले. अशा पध्दतीच्या आम्हाला ब—याच पावत्या बेकायदेशीर बनविलेल्या निदर्शनास आल्या. हे आमच्या निदर्शनास आल्यानंतर आम्ही त्याबाबत आमच्या मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविले. त्यानंतर आमच्या मुख्य कार्यालयामार्फत वासुदेव महाले यांची सत्यशोधनाकरिता नियुक्ती केली. त्यांच्या नियुक्तीबाबतचे पत्र मी आजरोजी

सोबत आणलेले आहे. ते आमचे कार्यालयीन पत्रव्यवहार असल्याकारणाने मी ती तपासादरम्यान तपासीक अधिकारीला दिली नव्हती अगर त्यांनी मागणी केलेली नव्हती. मी ती आजरोजी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे व मी ती दाखल करीत आहे. मला आता ते पत्र निशाणी ६२/१ दाखविले. ते पत्र आमचे मुख्य कार्यालय मुंबई येथील उप महाव्यवस्थापक (प्रशासक) यांनी विभागीय व्यवस्थापक या नात्याने मला पाठविलेली होती. म्हणुन त्याची प्रत माझेजवळ आहे. त्यावर उप महाव्यवस्थापक म्हणुन बोरसे यांची सही आहे. ती मी ओळखतो. ते आमचे प्रशासनाचे प्रमुख असल्याने व आमच्यामध्ये नेहमी पत्रव्यवहार होत असल्याकारणाने मी त्यांची सही ओळखतो. त्या पत्रावर मिळाले म्हणुन आमचा विभागीय कार्यालयाचा आवक क्रमांक नमूद आहे व माझी मिळाल्याबाबतची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. मी तशी खात्रीही केली होती. त्या पत्रास **नि.क्र.६३** देण्यात येते.

९. त्या पत्रान्वये नियुक्ती झालेले महाले हे आमच्या विभागीय कार्यालयात येवुन आवश्यक ती माहिती घेवुन संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाकडे जावुन त्याची संपुर्ण माहिती व दस्तऐवजांची पाहणी केली. त्यांनी अहमदनगर जिल्हयातील १४ पंचायत समित्यांमधील कृषी विभागातील सर्व माहिती जमा करून पहिला सत्यशोधन अहवाल बनविला. त्या सत्यशोधण अहवालामध्ये रू.६६,०३,५९८/— रूपयांची अफरातफर आढळली. तो सत्यशोधन अहवाल निशाणी ५७ ला दाखल आहे.

१०. त्यानंतर त्यांनी १४ तालुका कृषी अधिकारीक कार्यालयात जावुन माहिती घेतली व दस्तऐवजांची पाहणी केली व त्या आधारे दुसरा सत्यशोधन अहवाल बनविला. तो निशाणी ५८ ला दाखल आहे. त्या अहवालामध्ये रू.५४,९५,१५५/— रूपयांची अफरातफर आढळली. त्यानंतर महालेंनी तो अहवाल महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे सादर केला व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी फिर्याद दाखल केली.

सरतपास पुर्ण.

शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे वकील :

आरोपींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(माया अ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

दि.२१/०२/२०२३

शपथेवर उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील :

११. मी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये त्यांचे नाशिक येथील विभागीय कार्यालयात कार्यरत होतो. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत येते. सदर महामंडळाचे अध्यक्ष हे महाराष्ट्राचे कृषी मंत्री असतात. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळ हे महाराष्ट्र शासन निर्गमित असल्याने त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अटींचे पालन आम्हाला करावे लागते. मला सांगता येणार नाही की, महाराष्ट्र शासनाचे सेवानियम महामंडळाला लागू होतात की नाही. साक्षीदार सांगतो की, तो प्रशासकीय भाग असल्याने माझे अखत्यारितला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी विभागीय प्रमुख असल्याने मी शासनाचे सेवा नियम पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळातील कोणत्याही कर्मचा—याची विभागीय चौकशी करण्याकरिता ते सेवानियम विचारात घेतले जातात.

१२. हे म्हणणे खरे आहे की, नाशिक विभागीय मंडळामध्ये त्याचे अंतर्गत असणा—या सर्व शाखांमध्ये गैरव्यवहार आढळला त्या सदंर्भात चौकशी अधिकारी नेमूण चौकशी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या चौकशी प्रकरणामध्ये मला व दुसरे साक्षीदार श्रीमती दाणी यांना दोषी धरलेले

आहे. हे म्हणणे खरे नाही की, विधानसभेमध्ये फसवणुक झाली असा आरोप माझेवर ठेवुन विषय चर्चेत मांडला होता. हे म्हणणे खरे आहे की, डी.एम. दुधाडे हे नाशिक विभागामध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणुन होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी माझी अपदानाची रक्कम अदा करू नये असे आदेश पारित केले होते. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळाच्या शाखेमध्ये कोणतेही व्यवहार रोखीने होत नाही. सर्व व्यवहार हे डी.डी. आर.टी.जी.एस., निफ्ट व धनादेशाव्दारे केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, नाशिक विभागातील नगर शाखेला खात्यातील पैसे काढण्याकरिता धनादेशावर माझे सहयांची आवश्यकता असते. माझेमते नगर शाखेतील बॅंकेचे पैसे काढणे घेणे हे सर्व व्यवहार करण्याचे अधिकार तेथील शाखाप्रमुखास असतात.

प्रश्न — असे अधिकार शाखाप्रमुखाला असतात हे दाखविण्याकरिता कोणता ठराव झालेला आहे का ?

उत्तर — ते सर्व प्रशासकीय अधिकार असतात व ते आमचे मुख्य शाखा मुंबई येथून जारी झालेले असतात त्यामुळे तसा ठराव आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही.

१३. नगर शाखेचे बॅंक खाते एच.डी.एफ.सी. बॅंकेमध्ये आहे. त्याचा खाते क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नगर शाखेत जे दैनंदिन व्यवहार होतात त्याचा अहवाल दररोज नाशिक विभागाच्या कार्यालयात येत असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी अधुन मधुन नगर शाखेच्या कार्यालयास भेटी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा जेव्हा शाखेला भेट देतो तेव्हा तेव्हा तेथे झालेले व्यवहार व पैसे कसे आले गेले या गोष्टींचा आढावा घेत असतो. हे म्हणणे खरे आहे की, उधारीवर दिलेल्या मालाचा वसुलीचा तगादाही ब—याच वेळेला मला करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, वसुलीदरम्यान आमच्या शाखेतील व विभागातील नेमूण दिलेली व्यक्ती आम्ही संबंधीत थकबाकीदार यांचेकडुन रकमेचा धनादेश अगर डी.डी. स्वीकारतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या महामंडळामध्ये रोख

रक्कम स्वीकारण्याची प्रथा नाही. डिलरांनाही रोखीने व्यवहार चालत नाहीत याची माहिती असते व वेळोवेळी आम्ही ती कळवतो. हे म्हणणे खरे नाही की, नगर येथील एच.डी.एफ.सी. बॅक खाते चालविण्यासाठी सहीचे नमूणे मी दिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शाखेकडुन ज्या रकमांच्या वसुली झालेल्या नाहीत त्या ब—याच वसुलीच्या कार्यवाही मी केलेल्या आहेत. आमच्या कार्यालयीन कामासाठी आर्थिक वर्ष हे एप्रिल ते मार्च चालते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक शाखेत प्रत्येक आर्थीक वर्षीकरिता लेखापरिक्षण होते. हे म्हणणे खरे आहे की, लेखापरिक्षणाकामी लेखा परिक्षकाने मागितलेले आमच्या कार्यालयातील सर्व दस्तऐवज आम्ही त्यास उपलब्ध करून देत असतो.

१४. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप दाखल होईपर्यंत लेखा परिक्षकाने नगर शाखेमध्ये गैरव्यवहार झालेले आहेत असा तर्क त्याचे लेखापरिक्षण अहवालामध्ये दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, लेखापरिक्षण अहवाल हे विभागीय कार्यालय तसेच मुख्य शाखेत जमा केले जातात. नगर शाखेचे किती बॅकेमध्ये खाते आहेत याची मला निश्चित माहिती नाही. साक्षीदार सांगतो की, एच.डी.एफ.सी. येथे खाते आहे इतकीच माहिती मला आहे. नगर शाखेतून किर्द विभाग नाशिक विभागात आल्यानंतर त्याव्दारे मला पैशांच्या व्यवहारांची माहिती मिळते.

१५. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील वादांकित रक्कम ही नाशिक विभागीय कार्यालयाचे बॅक खाते अगर नगर शाखेच्या बॅक खात्यातून काढण्यात आलेली नाही. महामंडळाकडे जमा असलेल्या रकमेबाबत नगर शाखेतून पैशांचा अपहार झालेला नाही. शाखेतील लिपीकाचे काम हे वरिष्ठांच्या आदेशानुसार नोंदी घेण्याचे असते. हे म्हणणे खरे नाही की, लिपीकांना ब—याच वेळा त्यांचे वरिष्ठ नोंदी घेण्यासंदर्भात सांगत असतात.

१६. सत्यशोधन अधिकारी महाले यांनी त्यांचा अहवाल तयार करताना काय दस्तऐजांनी पडताळणी केली याचे मला व्यक्तीशः ज्ञान नाही. महाले यांची नेमणूक मी स्वतः केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी जो काहीही पडताळणी अहवाल तयार केला तो आमच्या मुख्य कार्यालयाला दिला. हे म्हणणे खरे नाही की, महाले यांचे अहवालात प्रस्तुत प्रकरणातील आरोपींविरूध्द कोणतेही ताशेरे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, महाले यांचे संपुर्ण कामकाज हे आमच्या मुख्य शाखेत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुत प्रकरणातून बाहेर काढण्यासाठी मी महालेंकडुन चुकीचा अहवाल घेतला.

१७. हे म्हणणे खरे नाही की, महामंडळाने नाशिक येथील न्यायालयामध्ये माझे विरूध्द वसुलीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्याव्दारे माझेकडे रक्कम रू.३८,०२,८८९/— वसुल होउन मिळावी अशी विनंती केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर रकमेच्या वसुलीची नोटीस मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरची रक्कम महामंडळाकडे जमाही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीत नमूद केलेल्या पावत्यांच्या रकमा आजही महामंडळाकडे येणे बाकी दाखवत आहेत. मला माहिती नाही की, त्या लोकांना महामंडळामार्फत वसुलीच्या नोटीसा जारी झाल्या आहेत किंवा कसे. मी साक्ष देण्यापुर्वी फिर्यादीत नमूद केलेल्या व्यवहारांची स्थिती काय आहे याची माहिती घेतली नव्हती. त्या रकमा वसुल झालेल्या आहेत किंवा नाहीत याबाबत मला काहीही सांगता येणार नाही.

१८. हे म्हणणे खरे नाही की, जर का एखाद्या हेडला येणारे पैसे त्या हेडखाली न दाखविता दुस—या हेडखाली जमा दाखविले तर त्यास अपहार म्हणता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, चुकीच्या हेडखाली आलेले पैसे देखील महामंडळाच्या किर्दमध्ये नमूद केलेले असतात व पैसेही महामंडळाच्या खात्यात असतात. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीत नमूद असलेल्या

व्यवहारांबाबत कोणतीही वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये मी स्वत: वादांकित व्यवहाराची चौकशी केली असे नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, महाले यांनी शाखेमध्ये येवुन कधीही कोणतेही दस्तऐवज तपासलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रथम फिर्याद दिली व त्यानंतर फिर्यादीशी सुसंगत असा खोटा अहवाल माहलेंच्याकडुन तयार करून घेतला.

१९. हे म्हणणे खरे आहे की, आमचे महामंडळ कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यासाठी आमच्या महामंडळाच्या संचालक मंडळाने ठराव करून अधिकृत केलेले नाही. तशी प्रत दोषारोप पत्रासोबत दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसे अधिकार नव्हते म्हणुनच त्याची प्रत फिर्यादीसोबत अगर दोषारोपपत्रासोबत जोडलेली नाही.

२०. हे म्हणणे खरे आहे की, तालुका कृषी अधिका—यांनी व्यवहाराचे जे कोणतेही धनादेश अगर डी.डी. दिलेले आहेत ते महामंडळाच्या खात्यावर जमा झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये ज्या लोकांच्या पैशांचा अपहार झाला असे सांगितलेले आहे त्या लोकांनी त्यांचे पैशांचा अपहाराची तक्रार आम्हाला, पोलीसांना अगर न्यायालयात केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या विरोधात त्यांनी महामंडळाच्या खात्यातून पैसे काढुन अपहार केला अशीही तक्रार कोणीही दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ६३ लगत दाखल पत्र हे खोटे व बनावट आहे व ते फिर्याद दाखल झाल्यानंतर बनविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ६३ चे पत्र हे दोषारोप पत्रासोबत दाखल झालेले नव्हते व मी ते साक्षीच्यावेळी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ६३ चा दस्त हा माझेसमक्ष बनविण्यात आलेला नाही व त्यावरील सहयाही माझेसमक्ष घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ६३ च्या पत्रावर बोरसे यांची सही नाही व ती सही खोटी व बनावट आहे.

मध्यांतरामुळे पुढील उलटतपास दुस—या सत्रापर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(माया अ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

दि.२८/०३/२०२३

शपथेवर पुढील उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे त्यांचे वकील :

२१. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५९ ची पावती माझेसमक्ष बनविण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ५९ ही पावती माझेसमक्ष बनविली नसल्याने ती कोणी लिहिली, कशाच्या आधारे लिहिली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५७ व ५८ लगत दाखल असणा—या सत्यशोधन अहवालामध्ये नमूद केलेली रक्कम रू. ६६,०३,५९८/— व रू.५४,९५,१५५/— ही महामंडळाच्या खात्यामध्ये जमा आहे. तालुका कृषी अधिका—यांकडुन आलेले डी.डी. हे महामंडळाच्या नावाने होते व ते डी.डी. महामंडळाच्या एच.डी.एफ.सी. बॅकेतील खात्यामध्ये जमा झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सत्यशोधन अहवालामध्ये नमूद असणा—या रू.६६,०३,५९८/— व रू.५४,९५,१५५/— या रकमांचा अपहार झालेला नाही. साक्षीदार सांगतो की, त्या रकमा माझे फिर्यादीनुसार संबंधित खात्यात संबंधित खातेधारकाला दिलेल्या नसल्यामुळे अपहार आहे. हे म्हणणे खरे आहे की, रू.६६,०३,५९८/— व रू.५४,९५,१५५/— या रकमा आजही महामंडळाच्या खात्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी रू.६६,०३,५९८/— व रू.५४,९५,१५५/— या रकमांचा अपहार केला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी लक्ष्मी ड्रेकन सोलापुर यांना बनावट पावती दिली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, उन्मेश फर्टीलायजरर्स यांचे नावे बेकायदेशीर पावती असल्याचे आढळले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादांकित रक्कम

ही डी.डी. ज्यांनी दिले त्यांच्या नावे जमा न होता दुस—या व्यक्तीच्या नावे जमा झाले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महामंडळाने सखोल चौकशीचे आदेश दिले, त्या आदेशानुसार सखोल चौकशी झाली, त्यामध्ये आरोपींनी अपहार केल्याचे दिसले, आरोपींनी खोटे व बनावट पावत्या बनविल्याचे आढळले हे सर्व खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखावर दाखल निशाणी ५७ व ५८ वर महाले यांच्या सहया आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पार्टी कोड व विभाग कोड चुकीचे लिहून पावत्या तयार केलेल्या आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ६३ वर बोडखेंची सही आहे असे मी खोटे सांगत आहे.

२२. फिर्याद ही मुख्य कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींची नावे मुख्य कार्यालयातून सांगण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य कार्यालयाने तक्रार कशी द्यायची व कशाकरिता द्यायची याबाबत सुचना दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी मुख्य कार्यालयाच्या सुचनांनुसारच प्रस्तुतची फिर्याद देवुन कार्यवाही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीबाबत वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, उन्मेश फर्टीलायझरर्स व इतर यांच्या नावे रकमा नोंदल्या असे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

शपथेवर पुढील उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे त्यांचे वकील श्री. गुंदेचा :

२३. हे म्हणणे खरे आहे की, आमचे मुख्य कार्यालय मुंबई, विभागीय कार्यालय नाशिक व उपविभागीय कार्यालय अहमदनगर येथे आहे. आमचे महामंडळाचे उपविभागीय कार्यालयामध्ये पशुखाद्य, खते, जंतुनाशके, कृषी अभियांत्रिकी व नोगा असे पाच उपविभाग आहेत. हे म्हणणे खरे आहे की,

सदर पाचही विभागात वेगवेगळे अधिकारी नियुक्त केले जातात. पशुखाद्य ासाठी अहमदनगर उपविभागामध्ये आरोपी क्र.३ यांची नियुक्ती होती. हे म्हणणे खरे आहे की, अहमदनगर उपविभागाकरिता सन २०१२ ते २०१५ करिता मी कृषी अभियांत्रिकी अधिकारी म्हणुन कार्यरत होतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, अहमदनगर उपविभागाकरिता सन २०१२ ते २०१५ करिता मी कृषी अभियांत्रिकी अधिकारी म्हणुन कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ ते २०१८ या कालावधीकरिता अहमदनगर उपविभागाचा प्रभारी अधिकारी म्हणुन माझी नेमणुक होती. हे म्हणणे खरे नाही की, अहमदनगर उपविभागाचा व प्रभारी अधिकारी म्हणुन माझेकडे तसा चार्ज देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ ते २०१५ तसेच सन २०१५ ते २०१८ या कालावधीचा नाशिक विभागाचा कृषी अभियांत्रिकी अधिकारीचा चार्जही माझेकडे सोपविण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळमध्ये भागवत लांबे या नावाने माझे व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती कार्यरत नाही. हे म्हणणे खरे आहे की, महामंडळामध्ये ज्यांची नियुक्ती होते त्यांना नियुक्ती पत्र दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्ती पत्रामध्ये त्या व्यक्तीस नेमूण दिलेल्या कामाचे विवरण नमूद असते. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्ती पत्राव्यतिरिक्त दुसरे कामकाज त्या व्यक्तीकडे सोपवावयाचे असेल तर त्यासाठी प्रभारी कार्यभाराबाबत वेगळा आदेश पारित केला जातो.

२४. माझे शिक्षण बी.टेक कृषी अभियांत्रिकीमध्ये झालेले आहे. आरोपी क्र.३ यांचे शिक्षण बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच. मध्ये झालेले आहे. महामंडळामध्ये शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्त्या झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ ते २०१८ या कालावधीमध्ये अहमदनगर उपविभागामध्ये कृषी अभियांत्रिकी अधिकारी म्हणुन कोणतीही व्यक्ती कार्यरत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कृषी पंचायत समितींचा संपुर्ण व्यवहार हा केवळ कृषी अभियांत्रिकी अधिकारी यांचेशी मर्यादित असतो.

२५. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही डिलर नियुक्त केला जातो

तेव्हा त्याचा व महामंडळाचा करारनामा होतो. हे म्हणणे खरे आहे की, डिलरला माल उधारीवर देताना त्याच्याकडुन बॅक गॅरन्टी घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, अहमदनगर उपविभागामध्ये कोणताही कृषी अभियांत्रिकी अधिकारी नियुक्त नसल्याने त्याचा सर्व व्यवहार हा नाशिकच्या विभागीय कार्यालयामार्फत चालत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी अहमदनगर उपविभागाकरिता कृषी अभियांत्रिकी अधिकारीची नेमणुक होती हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणुनबुजुन तसा पुरावा तपासादरम्यान दिलेला नाही. मी सन २०१२ ते २०१८ या कालावधीकरिता अहमदनगर उपविभागाकरिता कृषी अभियांत्रिकी अधिकारी नियुक्त केला गेला होता अगर पदभार प्रभारी अधिकारीकडे दिला होता हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल करून शकत नाही. सन २०१२ ते २०१५ या कालावधीकरिता अहमदनगर उपविभागाचे कृषी अभियांत्रिकी अधिकारीचे कामकाज हे नाशिक विभागातील कृषी अभियांत्रिकी अधिकारी म्हणुन माझेकडे होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ ते २०१८ या कालावधीकरिता मी अहमदनगर उपविभागाचे कृषी अभियांत्रिकी अधिकारीचा प्रभारी अधिकारी म्हणुन काम पाहत होतो.

२६. हे म्हणणे खरे आहे की, डिलरला माल देताना डिलेव्हरी चलान व बिल देताना हे ज्या विभागाचा माल आहे त्या विभागाच्या प्रमुखाचे सहीनिशी दिले जाते. माल उधारीवर दिल्याबाबत डिलेवरी चलानवर ते उधारीवर असल्याची नोंद असते. हे म्हणणे खरे नाही की, जर का उधारीवर माल डिलेवरी चलानव्दारे दिला व त्यानंतर जागेवर त्याने डी.डी. अगर धनादेश दिला तर त्यासाठी व्हाउचर बनवुन दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित डिलरने घेतलेल्या मालापोटी दिलेले डी.डी. किंवा धनादेश म्हणुन व्हाउचर जारी केले जातात.

२७. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील नमूद केलेल्या डिलरचा कोणताही करारनामा मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे

म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये अभिषेक फर्टीलायझरर्स साकुर असा वितरक असल्याबाबत नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर वितरकाचे नाव पहिल्यांदा पुराव्यादरम्यान सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, नाशिक विभागामध्ये अकाउंट विभागाचे प्रमुख म्हणुन शैलजा दाणी यांची नियुक्ती आहे. त्या पुर्ण नाशिक विभागातील तसेच त्या अंतर्गत असणा—या सर्व उपविभागातील अकाउंट विभागातील नियंत्रक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नाशिकमधील सर्व उपविभागांचे अकाउंट त्यांच्या नियंत्रणाखाली केले जाते.

२८. अहमदनगर उपविभागाकरिता खत विभाग याचे प्रमुख म्हणुन आरोपी क्र.२ यांची नियुक्ती आहे.

न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(माया अ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर

दि.२८/०३/२०२३